# ECHO OF HIS CALL

# बोलाविण्याचा प्रतिध्वनी

MARATHI

*India's National Spiritual Newspaper*

₹ 10/-

ECHO OF HIS CALL 1969-2019 GOLDEN JUBILEE REACHING NATIONS

Published monthly in ENGLISH, TAMIL, MALAYALAM, TELUGU, HINDI, KANNADA, MARATHI, BENGALI, GUJARATI, ODIYA, ASSAMESE, PUNJABI, NEPALI, URDU, SINHALA & AFRIKAN

Editor : S. SAM SELVA RAJ | 16 Languages | Associate Editor : Rev. SHASHI TIWARI

VOL: XXVI | YEAR OF OUR LORD JESUS CHRIST, 2024 JUNE | No. 05


## पवित्र शास्त्र

कृपया हा शास्त्र भाग पाठ करा

नीतिसूत्रे २१:१-१०

१. राजाचे मन पाटांच्या पाण्याप्रमाणे परमेश्वराच्या हाती आहे; त्याला वाटेल तिकडे तो ते वळवितो.

२. मनुष्याचें सर्व मार्ग त्याच्या दृष्टीने नीट आहेत; पण अंत:करणे तोलून पाहाणारा परमेश्वर आहे.

३. धर्माने व न्यायानें वागणे हे परमेश्वराला यज्ञापेक्षा विशेषमान्य आहे.

४. चढेल दृष्टि व गर्विष्ठ अंत:करण तसाच दुर्जनांच्या शेताचा उपज ही पापरुप होते.

५. उद्योगाचे विचार समृद्धि करणारे असतात; जो कोणी उतावळी करितो तो दारिद्र्याकडे धाव घेतो.

६. असत्य जिव्हेंने मिळविलेले धन इकडे-तिकडे उडून जाणाऱ्या वाफेसारखे आहे; मृत्यूच्या मागे लागणारे त्याला बोलावितात.

७. दुर्जनांचा बलात्कार त्यांस उडवून टाकील; कारण ते न्यायानें वागण्यास तयार नसतात.

८. अपराधांचा भार वाहणाऱ्याचा मार्ग फार कुटिल असतो; पण जो शुद्ध असतो त्याचे वर्तन सरळ असते.

९. भांडखोर बायकोबरोबर प्रशस्त घरात राहाण्यापेक्षा धाब्याच्या एका कोपऱ्याला बसणे पुरवले.

१०. दुर्जनाचें मन वाईट इच्छिते, शेजाऱ्यावर तो कृपादृष्टि करीत नाही.

# देवाला याची गरज तुम्ही! THE LORD NEEDS YOU!

*मानद् प्रमुख संपादक, रेव्ह. ॲन्जेलीन सेल्वाकुमारी*

सर्वत्र पसरलेल्या **एको ऑफ हिज कॉलच्या** माझ्या कुटुंबांना शुभेच्छा!



आपण अर्धे २०२४ हे वर्ष संपविले आहे; यावर माझा विश्वासच बसत नाही. समय अतिशय वेगाने धावत आहे. मला वाटते यामुळेच बायबल आपल्याला आपण आपला समय शहाणपणाने वापरावा असे शिकविते. **"संधि साधून घ्या..."** (इफिस ५:१६) वेळे विषयी येशू ख्रिस्ताशिवाय कोणीही अधीक समजू शकत नाही. त्याच्या या जगात येण्याविषयीचा उद्देश जगापासून केव्हा गुप्त ठेवावा आणि केव्हा जाहिर करावा ते ठाऊक होते.

मार्क ११व्या अध्यायातील येशू ख्रिस्ताचा यरुशलेमातील प्रवेश हि एक महत्त्वाची घटना होती. तोपर्यंत, येशू ख्रिस्ताने तो मसिहा आहे हे सार्वजनीक रित्या जाहिर केले नव्हते. परंतु जेव्हा गाढवावर बसून यरुशलेममध्ये प्रवेश केला, तेव्हा त्याने तो मसिहा आहे हे उघडपणे जाहिर करून जरवऱ्या ९.९च्या वचनात करण्यात आलेली भविष्यवाणी पूर्ण केली.




एको ऑफ हिज कॉल *पाच मिनिटांचा संदेश*

## यू ट्युब ख्रिश्चन चॅनल
## पास्टर सॅम सेल्वा राज

**यांच्या सोबत प्रार्थनेत सहभागी होण्याची संधी**

इंग्रजी, हिन्दी, तमिळ आणि तेलगु

Every day – From 2.00 A.M.

प्रतिदिनी - पहाटे पाच वाजता रविवारची तमिळ भक्ति - ८.३० सकाळी

ECHO OF HIS CALL - (1969-2019 GOLDEN JUBILEE YEAR)



REACHING NATIONS

# तुमच्या अतिप्रिय बंधु कडून...



**आमचे कार्याविषयीचे धोरण**

आम्ही समकालीन पीढीला पुरातन आणि आरंभीच्या प्रेषितांची शिकवण तीची प्रखरता कमी न करता स्पष्ट करावी आणि शिकवावी ही काळाची गरज आहे.


HON. EDITOR-IN-CHIEF

Rev. Angeline S. Kumari, M.A., M.Sc., M.Ed.

HON. MANAGING EDITOR

Pastor Alex Samson Sam, B.Th., M.Div.

GENERAL MANAGER

Bro. N. Prakasam, M.A., M.Sc.(C&P), PGDHRM., MBA.

ADMINISTRATION

Sis. Jesy Veena Sam
Adv. K. Puratchivendan, M.Com., C.A., B.L.
Dr. P.E.R. Premchand, M.Sc., M.A., M.Ed., Ph.D.
Dr. C.G.S. Baburao, B.Tech., M.Tech. (DM), Ph.D.
Dr. Rabinder Boaz, M.S. (CMC)

EDITORIAL BOARD

Dr. Serena Bevin, M.A., M.Phil., B.Ed.
Sis. Sajini Cherian
Sis. L. Mariya Anjalin, M.A., M.Sc., B.Ed.
Rev. Dr. K.R. Rajasekaran

EDITOR, PUBLISHER & PRINTER

Pastor S. SAM SELVA RAJ
Echo of His Call Printers
10, Mohammed Abdullah 2nd Street,
Chepauk, Chennai- 600 005, India.
Phone : (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766
Cell : (+91) 98410 71852, 98412 71858 95661 31858

E.MAIL

sam@echoofhiscall.org
biblecor@yahoo.co.in

WEBSITES

www.echoofhiscall.org
www.stpaulsmatriculation.com

YOUTUBE CHANNEL

Echo of His Call


**''परमेश्वराचे वैभव चिरकाल राहो! परमेश्वराला आपल्या कृतीपासून आनंद होवो.''**
**(स्तोत्र १०४:३१)**

ख्रिस्तामधील प्रिय मित्रांनो!

आम्ही आपल्या प्रभु व तारणाऱ्या येशू ख्रिस्ताच्या सर्वाधिक अद्‌भूत नामात शुभेच्छा देत आहोत!

तुम्हा सर्वांना हे माहित आहे, की आमच्या **नहेम्या बायबल कॉलेज**च्या अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांच्या १ जून २०२४ रोजी झालेल्या पदवी समारंभा नंतर ३ जून २०२४ रोजी चेपॉक (तामिळ भाषिक), संतोषपुरम (तामिळ भाषिक) आणि वेलाचेरी (निवासी हिन्दी भाषिक) येथील सुरु होणाऱ्या **बायबल कॉलेज**च्या तयारीत व्यस्त होतो. बाहेर पडलेले पदवीधर विद्यार्थी मंडळी नसलेल्या आशा विविध जागी सेवाकार्य सुरू करतील. कृपया त्याकरीता प्रार्थना करा.

हिन्दी भाषिक **नहेम्या बायबल कॉलेज** करीता आम्हाला M.Div, किंवा M.Th, पदवीधर प्राध्यापकांची आणि आणखीन हिन्दी भाषिक विद्यार्थी हवे आहेत.

आमच्या **सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन**, इंग्रजी स्कूलकरिता पूरेशे विद्यार्थी मिळावेत यासाठी प्रार्थना करा. उत्तम आत्मिक पुढारी तयार करण्याचे आणि शुभवर्तमान न पोहचलेल्या ठिकाणांमध्ये मंडळ्या रोपन कार्य करण्याचे आमचे प्रयत्न आहेत. आम्हाला तुमच्या प्रार्थनां पाठींब्याची गरज आहे.

सध्या प्रभुच्या कार्यात वाढ होत असताना आम्हाला कसल्या तरी आत्मिक संघर्षास सामोरे जावे लागत आहे. आमचे बहुतेक पुष्कळशे सेवक किंवा त्याचे कुटुंबिय आजाराने पीडित असल्यामुळे त्यांना त्यांच्या सेवाकार्यात पूर्णपणे लक्ष केंद्रित करणे कठीण जात आहे.

तुमच्या प्रार्थनां द्वारे आणि स्वेच्छा दानाद्वारे कृपया मदत करावी. पुरेसा निधी उपलब्ध होऊ न शकल्यामुळे आम्हाला आमच्या काही मिशनरी क्षेत्रातील सेवकांना त्याचे वेतन पाठविणे शक्य झाले नाहि. आमच्या सर्व गरजांकरिता आम्ही प्रभु येशू ख्रिस्ताकडे पाहात आहोत.

तुम्हा करीता आम्ही प्रार्थना करीत आहोत.

ख्रिस्त येशू मध्ये तुमचे दास.


**ॲलेक्स सॅमसन सॅम**
**पास्टर एस्. सॅम सेल्व राज**

(+91) 9841271858/9841071858 E-mail : sam@echoofhiscall.org


★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★

**''नंतर त्यांनी ते शिंगरु येशूकडे आणून त्याच्यावर आपली वस्त्रे घातली, व त्यावर तो बसला. मात्र पुष्कळ लोकांनी आपली वस्त्रे वाटेवर पसरली; इतरांनी शेतांतून डहाळे तोडून आणून वाटेवर पसरिले.''** (मार्क ११:७-८)



*उर्ध्वलोकी 'होसान्ना'*

येशू ख्रिस्त त्याला काय होणार आहे हे तो पूर्णपणे जाणून होता, तरी देखील


**Our Ministries:** ✪ ECHO OF HIS CALL Monthly Magazines (16 languages) ✪ BIBLECOR - Postal Courses (3 languages) ✪ YouTube Ministry ✪ Online Courses ✪ Theological Correspondence Courses (2 languages) ✪ Church Planting ✪ Nehemiah Bible Colleges ✪ Gospel Printing Press ✪ Great Commission Partners ✪ St. Paul's Matriculation School ✪ Crusades ✪ Community Development

## त्याच्या बोलाविण्याचा प्रतिध्वनी मासिकाच्या वाचकांनो – लक्ष द्या

**एको ऑफ हिज कॉल** यूट्युब चॅनलवर आमचे ५ मिनिटांचे मननपर संदेश दररोज पहाटे २.०० वाजता तामिळ, तेलगू, इंग्रजी आणि हिन्दी या भाषांमध्ये प्रसारीत केले जात आहेत. संदेश ऐकून तुम्ही देवाची कृपा प्राप्त करु शकता.

आणखी माझे मोबाईल क्रमांक (+९१)९८४१०७१८५८, आणि (९१)९८४१२७१८५८ (वैयक्तिक) तुमच्या मोबाईलमध्ये जतन करुन ठेवा.

**- पास्टर एस्. सॅम सेल्वा राज**

ती योग्य वेळ आहे हे ठाऊक होते म्हणून त्याने प्रवास केला. लोक करीत असलेल्या जयघोष, गाणे आणि स्तुति कानावर ऐकू येत असताना त्याला ठाऊक होते कि थोडक्याच दिवसात, त्याचा अपमान केला जाणार, कपडे काढण्यात येतील, थुंकण्यात येईल, फटके मारण्यात येतील आणि क्रुसावर खिळण्यात येणार. त्याला ठाऊक होते की त्याचा क्रुसावरील मृत्यु येणाऱ्या पुढील पिढ्यांकरीता आशीर्वाद ठरणार आहे; त्याची विपन्नावस्था सर्व मानव जातीला पापापासून मुक्ती प्राप्त होणार.



*शिष्यांना बांधलेले शिंगरु सापडले*

मार्क कृत शुभवर्तमानांचा ११वा अध्याय वाचत असताना तीन शब्दांनी माझे लक्ष वेधिले :-

**“...शिष्यांतून दोघांस असे सांगून पाठविले की समोरच्या गावांत जा; त्यात जातांच ज्याच्यावर कोणी मनुष्य कधी बसले नाही असे शिंगरु तुम्हांस बांधलेले आढळेल, ते सोडून आणा.”** (मार्क ११:२)

**शिष्यांना शिंगरु बांधलेले सापडले**

**१ = आढळेल**

**२ = ते सोडा**

**३ = ते आणा**

## १) शोधन काढा :-

येशू ख्रिस्ताने त्याच्या दोन शिष्यांना जावून गाढव शोधण्यास पाठविले. गाढव हे शांतिचे प्रतिक आहे, जसे शेलमोनाने मिसरातील घोडे हे युद्धाचे असल्याची ओळख करुन दिली. गाढव हे नम्रतेचे देखील प्रतिक आणि अवजड ओझे वाहणारे असे आहे. ते फार आकर्षक असे नाही परंतु यहूदी लोक त्यांचा फार मोठ्या प्रमाणात त्यांच्या शेतात आणि गिरण्यांमध्ये उपयोग करुन घेत असत.

येशू ख्रिस्ताची शिष्यांना आज्ञा होती की जाऊन गाढव शोधणे.

देव आज देखील गाढव (तुम्ही आणि मी) शोधण्याच्या उद्योगात आहे. तो अद्याप देखील जो त्याला, त्याच्या शब्दाला, आणि उद्देशाला वाहून नेईल त्याच्या शोधात आहे. तो अतिशय तळमळतेने ज्याच्याकडे समय आहे, इच्छा आहे आणि त्याच्या स्वामीद्वारे उपयोग करुन घेण्यास जो उपलब्ध आहे अशा व्यक्तिच्या शोधात आहे. तो मानवी साधनांच्या व्यवस्थापनात व्यस्त असा व्यवस्थापक आहे.

परंतु शिष्य जेव्हा गाढव शोधण्यास गेले, त्यांना ते जेथे दोन रस्ते एकत्र मिळतात तेथे दाराला बांधलेले सापडले.

आपण जे २०२४ मध्ये राहात आहोत, बांधलेल्या स्थितीत व्यस्त आहोत- शास्त्राभ्यासा करिता कां आला नाही? “पास्टर, मी कामामध्ये बांधिला गेलो होतो.” मी मागील रविवारी तुला मंडळीत पाहिले नाहि. “क्षमा करा पास्टर, मी माझ्या वैयक्तिक कामात किंवा कौटुंबिक कामात बांधला गेलो होतो.” उपासनेच्या सरावाकरीता कां आला नाहीस? “क्षमा करा माझ्या अभ्यासक्रमाच्या कामात बांधलेला होतो.” कृपया गैरसमजुत करून घेऊ नका; हे सर्व महत्त्वाचे आहे. परंतु सैतानाने आपल्याला कामात, कुटुंबात, नातेसंबंधात, शिक्षणात, आणि पैसे कमविण्यात कसे बांधून व्यस्त ठेविले आहे. आपण हे समजुन घेणे अगत्याचे आहे.

लोकांना वाटते जितका अधिक पैसा ते कमवितील तितकी अधिक बचत करु शकतात. नाही, तो निव्वळ मूर्खपणा आहे; आपण जितका अधिक मिळवू तितका अधिक खर्च केला जातो. काही वेळा लोक वस्तू खरेदी करतात आणि कर्ज फेडण्यासाठी अधिक तास काम करीतात, इतका कि खरेदी केलेल्या वस्तूचा आनंद घेण्यास देखील त्यांच्याकडे वेळ नसतो.

देव त्याला कोण वाहून नेऊ शकेल अशा लोकांना शोधण्याच्या प्रक्रीयेत अतिशय निराश होतो आणि त्याला दिसते कि ते दाराला बांधलेले आहेत. कामाचे दार, घरे बांधण्याचे दार, स्वत:चे साम्राज्य



*येशू ख्रिस्त तुमची काळजी घेईल!*

उभारण्याचे द्वार, त्यांचा सीमा वाढविण्याचे दार.

Busy हा इंग्रजी शब्द काय दर्शविते हे तुम्हाला ठाऊक आहे काय? सैतानाच्या जुवाखाली असलेले. सैतान आपल्याला सतत व्यस्थ ठेवितो, त्यामुळे आपल्याला प्रार्थना करण्यात, बायबल वाचण्यास, उपवास करण्यास, मनन करण्यास सहभागीता करण्यास आणि उपासनेला जाण्यास वेळ नसतो.

| | | |
|---|---|---|
| B | = | Being |
| U | = | Under the |
| S | = | Satan's |
| Y | = | Yoke |

**देव करो जे अतिशय अवजड आणि त्रासदायक असे आहे अशा सैतानाच्या जुना खालून सोडतो, आणि तारणाऱ्याच्या ओझ्या (जुवा) खाली आणी त्याचे जू सोईचे आणि ओझे हलके आहे.** (मत्तय ११:२८-३०).

आपण जर तारणाऱ्याच्या जुवा खाली नसणार, तर सैतानाच्या जूवाखाली असणार. सैतानाच्या जूवा खाली असतो, तेव्हा आपल्याला कुटुंबासाठी वेळ नसणार, देवाशी आपले वैयक्तिक नाते, आपल्या मंडळीतील जबाबदारीसाठी वेळ नसणार आपण पूर्णपणे देवाच्या इच्छेच्या किंवा हेतूच्या पासून दूर असणार, हिच निवड करण्याची वेळ आहे.

कदाचीत तुम्ही गोंधळले, आणि बावरलेले असे चौकात (crossroads) आहात. सर्व दिशांकडून ओढले जात आहात, निवड करु शकत नाही. स्वत:स जो येशू तुमच्या करिता क्रुसावर मृत्यु पावला, ज्याने तुमच्या सर्व दुखणे, चिंता, अपयश, शाप आणि शिक्षा घेतली त्याच्या हातात शरण जा. तो तुमचे मार्ग सरळ आणि मोकळे करील.



*पिटर दुर राहुन त्याच्या मागे गेला.*

किंवा तुम्ही कदाचीत बोलाल, मी अगदी माझ्या लहाणपणापासून परमेश्वराची सेवा केली हे तुला माहित आहे; पहा, आता मला काय झाले आहे; यासाठी मी पात्र नाही. मी देवाच्या जवळ येऊ इच्छीत नाही; त्याच्या जवळ राहून दु:खीत होण्यापेक्षा, त्याच्यापासून दूर राहिन आपल्याला जग आणि देव पाहिजे. मला त्याला दूर राहूनच त्यांच्या मागे जावयास आवडेल.


**अंतर ठेवून! दूरुन :-**

बायबल एक व्यक्ति जी येशू ख्रिस्ताला घडत असलेले दुरुन पाहत होती. तिच्या विषय स्पष्ट कथन सांगिते येशूच्या मागे दुरुन जात रहाणे धोकादायक कृति आहे. तुम्हाला लवकरच ते कळून येईल किंवा तुम्ही तुमच्या विश्वासाला दगा देत सध्या देवापासून दूर चालत आहात. तुम्ही तर्क करु शकता कां, दुरुन येशूच्या मागे कोण चालत होता? होय, पेत्र! "**पेत्र...दुरुन त्याच्या मागे-मागे चालत गेला...**" (मत्तय २६:५८)

दुरुन मागे-मागे चालणे हे अपयशाची तयारी करणे आहे. तुम्ही येशू ख्रिस्ताच्या मागे-मागे दुरुन चालत आहात, तर तुम्हाला निर्णय करण्याची गरज आहे कारण तुम्ही चौ-रस्त्यावर उभे आहात. येशू ख्रिस्त म्हणत आहे, "मी तुलाच शोधत होतो."

तुम्ही कोठेही गेलात, तरी तो तुम्हाला शोधून काढील!

## २) सोडा-बंधमुक्त करा



शिष्य जेव्हा गाढव शोधण्यास गेले, त्यांना ते चौरस्त्यावर परंतु बांधले असे आढळले.

आपला देव हा सभ्य असा देव आहे; तो कोणावरती बळजबरी करणार नाही.

(...पान ६ वर)


# निवासी बायबल कोर्स
## नेहम्या बायबल कॉलेज, चेन्नाई

माध्यम : हिंदी

प्रवेशा करिता त्वरा करा!

आंतरराष्ट्रिय ख्रिस्ती पुढाऱ्यांद्वारे आणि वरिष्ट पाळकांद्वारे ५४ वर्षांपासून मान्यता प्राप्त

ईश्वरविद्या सर्टीफिकेट
ईश्वरविद्या डिप्लोमा

शैक्षणिक पात्रता : १० वी इयत्ता आणि अधिक

संपर्क : अध्यक्ष : नहेम्या बाईबल कॉलेज

10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA.
Phone : (+91-44) 2852 8282, Cell : (+91) 98410 71852 / 95661 31858
E.mail : sam@echoofhiscall.org / Website : www.echoofhiscall.org

* ऑनलाईन क्लास उपलब्ध आहे *

# महान सेवाकार्याचे भागीदार
# प्रार्थना विनंत्या

स्तुति आणि प्रार्थनेचे मुद्दे १९ जुन ते १८ जुलै २०२४ पर्यंत

ओझी वाहाणे (गलती ६:२),
गरजा भागविणे (रोम १२:१३),
आणि कार्यास गती देणे (२ तिमथी १:६)

(कृपया हे पान बाजूला काढून, सतत प्रार्थना करण्याकरिता तुमच्या पवित्र शास्त्रात ठेवा)

## ✝ याकरीता देवाची स्तुती करा...

१९ जुन : १९६९ पासून मासिक प्रसिद्ध करण्याच्या सेवा कार्यातील त्याच्या आशीर्वादाबद्दल.

२० जुन : निवासी आणि सायंकालीन **नहेम्या बायबल कॉलेज**मध्ये प्रवेशा करीता विद्यार्थ्यांशी संपर्क साधण्यातील आमचे प्रयत्न आशीर्वादीत केल्याबद्दल.

२१ जुन : १ जुन २०२४ रोजी **नहेम्या बायबल कॉलेज**चा पदवीदान समारंभ अद्भूत रित्या आशीर्वादीत झाला.

२२ जुन : **नहेम्या बायबल कॉलेज व सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कूल**चे २०२३-२४चे शैक्षणिक वर्ष यशस्वी रित्या पार पडले.

२३ जुन : **एको ऑफ हिज कॉल** यूट्युब चॅनलवरील तामिळ, तेलगू, इंग्रजी व हिन्दी भाषिक संदेश आशीर्वादीत करीत असल्याबद्दल.

२४ जुन : मुख्य आणि शाखा मंडळ्यांनी आयोजीत केलेल्या सुट्टीतील शास्त्राभ्यास शाळा आशिर्वादीत झाल्या.

२५ जुन : आमच्या सर्व प्रार्थना भागीदार, वर्गणीदार, विश्वासातील भागीदार, आजीवन भागीदार आणि महान आज्ञापालनातील भागीदार यांना त्यांच्या कुटुंबासहीत दयेने आलींगन दिल्याबद्दल.

२६ जुन : **'ग्लोबल व्हिजन फॉर युथ ॲण्ड किडस् केअर'** द्वारे दररोज रात्री १० वाजता जगभरातील तरुण वर्ग आणि लेकरांसाठी करीत असलेल्या प्रार्थनावरील त्याच्या आशीर्वादाबद्दल.

२७ जुन : संस्था फलद्रुप होण्याकरिता आम्ही करीत असलेले प्रयत्न यशस्वी करीत असल्याबद्दल.

२८ जुन : आमच्या हितचिंतकाच्या प्रार्थना आणि आर्थिक प्रयत्न यशस्वी करीत असल्याबद्दल.

२९ जुन : १३ मे २०२४ रोजी **नहेम्या बायबल कॉलेज**च्या माजी विद्यार्थ्यांचे सम्मेलनावरील त्याच्या आशीर्वादाबद्दल.

३० जुन : दुष्ट शक्तिपासून आमच्या वरिष्ठ पाळक आणि त्यांच्या कुटुंबाला सुरक्षित ठेविल्याबद्दल.

०१ जुलै : आमची **एको ऑफ हिज कॉल** मासिक प्रसिद्ध करण्याकरिता समर्पित सहसंपादक पुरवून आशीर्वादीत केले.

०२ जुलै : **सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कूल, नहेम्या बायबल कॉलेज** आणि पत्रव्यवहारे करण्यात येत असलेल्या **बायबल अभ्यास क्रमावरील** त्याच्या आशीर्वादाबद्दल.

०३ जुलै : **एको ऑफ हिज कॉल**च्या सर्व कर्मचारी वर्ग व त्यांच्या कुटुंबियांना सुरक्षित ठेविल्याबद्दल.

## ✝ कृपया यासाठी प्रार्थना करा...

०४ जुलै : देवाने **एको ऑफ हिज कॉल** सेवा कार्याकरिता आणखीन समर्पित असे सेवक आणावेत.

०५ जुलै : जगभरात घेण्यात आलेल्या सुट्टीतील शास्त्राभ्यास शाळांमध्ये तारण पावलेल्या लेकरांकरिता.

०६ जुलै : २०२४-२५ या शैक्षणीक वर्षाकरिता **नहेम्या बायबल कॉलेज**मध्ये निवासी आणि सायंकालीन वर्गामध्ये प्रवेश करीता पात्र विद्यार्थी मिळावेत.

०७ जुलै : **सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कूल**मध्ये २०२४-२५ शैक्षणिक वर्षाकरिता प्रवेशासाठी नवीन विद्यार्थी मिळावेत.

०८ जुलै : शुभवर्तमान न पोंहचलेल्या दुर्गम भागांमध्ये ते गाजविण्याची सेवा करीत असलेल्या मिशनऱ्यांना दैवी संरक्षण मिळावे.

०९ जुलै : कार्यालयीन व मुद्रणालयातील स्टाफच्या उत्तम आरोग्यासाठी.

१० जुलै : देवाने या महिन्यातील आर्थिक गरजा पुरव्याव्यात.

११ जुलै : पददलीत लोकांच्या आर्थिक पातळीत सुधारणा व्हावी.

१२ जुलै : देवाने जगभरातील सर्व देशांना देवाचे भय असणारे पुढारी देऊन आशीर्वादीत करावे.

१३ जुलै : भारतातील शुभवर्तमान न पोंहचलेल्या भागात ते नेणे शक्य व्हावे.

१४ जुलै : जगात सर्वत्र शांति प्रस्थापित व्हावी.

१५ जुलै : आमच्या वरिष्ठ पाळकांना त्यांचे आत्मचरित्र लिहिण्यात यश प्राप्त व्हावे.

१६ जुलै : आमच्या सेवा कार्याच्या विस्तारासाठी आणि जगभरातील सुवार्ता गाजविण्यासाठी

१७ जुलै : सर्व दुष्ट शक्तिपासून आमचे वरिष्ठ पाळक पास्टर एस् सॅम सेल्वाराज यांना आणि त्यांच्या कुटुंबियांना सुरक्षित जीवन जगता यावे.

१८ जुलै : जगभरात सेवा करीत असलेल्या मिशन यंना दैवी संरक्षण प्राप्त व्हावे

(पान ४ वरुन)

तो आपल्यावर इतके प्रेम करतो, की तो त्या उधळ्या पुत्राचा पिता जसा त्याच्या येण्याची दररोज वाट पहात होता तशी



*परमेश्वर तुमचे आश्रु जाणतो.*

आपली वाट पाहात आहे. हे आपल्या स्वर्गीय पित्याचे प्रेम! तो अद्याप तुमची वाट पहात आहे.

आपल्यापैकी काहीजण आपली मने आणि हृदये एक दुसऱ्याच्या विरुद्ध असल्यामुळे एकत्रीत येऊ इच्छित नाहीत. आपण म्हणतो, ''प्रभु तुझ्या इच्छेनुसार होऊ दे,'' परंतु नंतर आपण म्हणतो, ''प्रभु माझ्या हृदयाची इच्छा पूरी कर''. हा विरोधाभास आपल्या ख्रिस्ती वाटचालीत आपल्याला मागे ओढतो. देवाची इच्छा आहे की त्याने आपल्याकरिता जे योजीले आहे त्याकडे पुढे पुढे जावे, परंतु आपण मात्र आपल्या इच्छेमुळे मागे रहातो.

तुम्ही देवाची सेवा करुन, त्याला संतोषविणारे जीवन जगू इच्छिता, परंतु तुम्ही बांधलेले आहात, हालू शकत नाही. दु:खीत अंत:करणाच्या स्थितीत, भावनाचा चक्काचुर झालेल्या अशावेळी केवळ देवालाच तुमचे अंत:करण कळते. लोक केवळ तुमच्या चेहऱ्यावरील हास्यच पहातात, रात्रीच्या अंधकारात तुम्ही ढाळलेले अश्रु कोणालाही ठाऊक नसतात.

देव तुमची बांधून टाकण्यास भाग पाडणाऱ्या, गोष्टीतून तुम्हाला अडकवून तुमच्या प्रगतीत अडखळण करणाऱ्या



*मोआबना राजा इस्त्राएलना शाप देण्यास बलामला विंनती करतो.*

गोष्टितून मोकळे करु इच्छितो; येशूकडे वळा; तो एकेका व्यक्तिला सक्रीयपणे बंधमुक्त करीतो हि तुमची वेळ आहे, तुम्हाला जखडून टाकणाऱ्या गोष्टिपासून प्रभुला तुम्हाला मोकळे करु द्या. तुमच्या प्रवासास अडखळविणाऱ्या कालचक्रातून मुक्त करुन पुढे जाण्यासाठी स्वतंत्रता शोधा.

## बलाम आणि बालाक!


गणना पुस्तकाच्या २२व्या अध्याय आपल्याला बलाम संदेष्ट्याची गोष्ट सांगतो. बायबल सांगते की त्याला आशीर्वाद आणि शाप देण्याचा अधिकार होता, त्यामुळे मवाबाच्या राजाने त्याला तीनवेळा इस्त्राएलाला शाप देण्याची विनंती केली. अगदी सुरुवाती पासूनच हि देवाची इच्छा नाही हे तो जाणून होता. तरी तो त्या चौरस्त्यावर बांधीलेल्या गाढवासारखा-पैसा, प्रसिद्धि, मालमत्ता, अधिकार, सामर्थ्य आणि आकर्षण यांना बांधले होतो. देवाला काय हवे आहे आणि त्याला स्वत:ला काय हवे आहे यांत सापडला होता.

प्रिय मित्रांनो; तुम्ही बलामाप्रमाणे चौरस्त्यावरच रहाल, तर ती प्रसन्न फेरी नसणार. देवाचा दूत त्याच्या पुढे विरोधकाप्रमाणे आडवा आला.

''त्याला विरोध करण्यासाठी देव रस्त्यावर उभा राहीला.'' आज जर तुम्ही तुमचे मार्ग बदलणार नाही, तर तो तरवार घेऊन तुमच्या विरुद्ध उभा राहिल.

देव तुम्हाला एकत्रीत करु इच्छितो, परंतु प्रश्न असा आहे, तुम्ही एकत्रीत होऊ इच्छिता कां?

## ३) घेऊन या!



देव तुम्ही एकत्रीत व्हावे याकरीता तुमची वाट पाहात आहे, अशासाठी की तुम्हाला परत आणावे.

(...पान ८ वर)


# नहेम्या बाईबल निवासी कॉलेज

वेलाचेरी आणि चेपॉक संतोषपुरम

ECHO OF HIS CALL 1989-2019 GOLDEN JUBILEE REACHING NATIONS

माध्यम : तमिळ

आंतरराष्ट्रिय ख्रिस्ती पुढाऱ्यांद्वारे आणि वरिष्ट पाळकांद्वारे ५४ वर्षांपासून मान्यता प्राप्त

प्रवेशा करिता त्वरा करा !

ईश्वरविद्या सर्टीफिकेट
ईश्वरविद्या डिप्लोमा

शैक्षणिक पात्रता : १० वी इयत्ता आणि अधिक

संपर्क : अध्यक्ष : नहेम्या बाईबल कॉलेज

10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA.
Phone : (+91-44) 2852 8282, Cell : (+91) 98410 71852 / 95661 31858
E.mail : sam@echoofhiscall.org / Website : www.echoofhiscall.org

## कृपया आमच्या मुख्यालयातील सेवाकार्याकरिता प्रार्थना करा

१. प्रार्थना सेवा : २४ तास
२. बायबलकोर : पत्रव्यवहाराद्वारे अभ्यासक्रम : इंग्रजी, तामिळ आणि हिन्दी
३. एको ऑफ हिज कॉल : मासिक : इंग्रजी, तामिळ, मल्यालम, तेलगु, हिन्दी, कन्नड, मराठी, गुजराथी, बंगाली, ओरिया, नेपाळी, आसामी, पंजाबी, उर्दु, सिंहली आणि आफ्रिकन
४. नहेम्या बायबल कॉलेज (दोन केंद्र) (सायंकालीन / निवासी)
५. पत्रव्यवहाराद्वारे थियॉलॉजीकल अभ्यासक्रम : इंग्रजी आणि तामिळ
६. महान आजापालनाचे भागीदार (पाळकांचे नेटवर्क)
७. प्रशिक्षण कार्यक्रम
८. महासभा
९. छापील साहित्य वाटप आणि पाठ पुरावा
१०. शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय : प्रकाशने
११. सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कुल : गावातील इंग्रजी माध्यम हायस्कूल
१२. शब्बाथ शाळा : सकाळी ८.३० आणि सायंकाळी ४ वाजता - रविवारी
**१३. तामिळ उपासना : सकाळी ८.०० आणि १०,०० वाजता - रविवारी**
**१४. हिन्दी उपासना : सायंकाळी ४ वाजता - रविवारी**
**१५. तेलगु उपासना : सायंकाळी ५ वाजता - रविवारी**
**१६. इंग्रजी आणि तामिळ उपासना : सायंकाळी ६ वाजता - रविवारी**
१७. स्त्रियांची प्रार्थना : सायंकाळी ५.३० वाजता - बुधवारी
१८. पुरुषांची प्रार्थना : सायंकाळी ७ वाजता - शुक्रवारी
१९. शिष्यत्वाची सभा : सायंकाळी ६ वाजता - शनिवारी
२०. गृह प्रार्थना सभा : सायंकाळी ६.३० वाजता - मंगळवारी/गुरुवारी
२१. विशेष प्रभु भोजन : पहाटे ६ वाजता प्रत्येक महिन्याच्या १ल्या दिवशी
२२. सेवाकाची समालोचन सभा : सायंकाळी ५.३० वाजता - पहिला शनिवार
२३. पालकांची प्रार्थना : सायंकाळी ४ वाजता - पहिला रविवार
२४. रात्रभर प्रार्थना : सकाळी ९.३० वाजता - दुसऱ्या शुक्रवार
२५. उपास प्रार्थना : सकाळी ९.३० वाजता - तिसऱ्या शनिवार
२६. पवित्र सहभागिता : दुसऱ्या रविवारच्या उपासनेत
२७. सकाळचे मनन : पहाटे ५ वाजता - दररोज
२८. कार्यालयीन स्टाफचे मनन : सकाळी ९ वाजता - दररोज
२९. कार्यालय : सकाळी ९ ते रात्री ९ पर्यंत (रविवार वगळून)

## एको ऑफ हिज कॉल टपाल द्वारे अभ्यासक्रम

### १) बायबलकोर

आम्ही नवीन ख्रिस्ती विश्वासणारे आणि अन्य विश्वासातील लोकांकरिता टपालाद्वारे बायबल मधील पायाभूत सत्यांवर इंग्रजीत ५७ पाने, हिन्दी ७६ पाने आणि तामीळमध्ये ९६ पानांचा अभ्यासक्रम देऊ करीत आहोत. तुम्हाला 'न्यु लाईफ फॉर यू' या शिर्षकाचे अभ्यासक्रमाचे पुस्तक देण्यात येईल! **अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर, तुम्हाला प्रमाणपत्र दिले जाईल. अभ्यासक्रमाकरिता आवश्यक अशी फी आकारली जाणार नाही. तुम्ही आशीर्वादित व्हाल!**

### २) टपालाद्वारे ईश्वर विज्ञान आभ्यासक्रम

हा अभ्यासक्रम सुर्वानिक, ख्रिस्ती पुढारी आणि अरिक्षित सभासद ज्यांना देवाची सेवा करण्याची तीव्र इच्छा आहे, अशा करिता इंग्रजीत ५३७ पानांचा आणि तामिळ भाषेत ६५२ पानांचा अभ्यासक्रम उपलब्ध आहे. अभ्यासक्रमाची १००० रुपये फी आकारली जाते. त्यामध्ये १४९ अध्याय/पाठ समाविष्ट असलेली एकूण ७ पुस्तके देण्यात येतील. '**सर्टफिकेट इन मिनिस्ट्री**' प्रमाणपत्र देण्यात येईल. देव तुम्हाला आशीर्वाद देईल!

***अधीक माहिती करिता आम्हाला लिहा -***

**अध्यक्ष - नहेम्याह बाईबल कॉलेज**

Echo of His Call, Post Box 2957
CHEPAUK, CHENNAI - 600 005.
Ph.: (044) 2852 8282, 2852 9293, 2854 7766,
Cell : 98410 71852, 95661 31858
E.mail : biblecor@yahoo.co.in

## एको ऑफ हिज कॉल

### मासिक (विनामुल्य) मिळविण्याची उत्तम संधी

तुम्ही तुमच्या मित्रांचे/नातेवाईकांचे पत्ते आमच्याकडे पोस्टाद्वारे, पत्राद्वारे, ई.मेल, वॉटस् ॲप किंवा फोन द्वारे पाठविल्यास, आम्ही त्यांना त्यांच्या पत्त्यावर मासिक विनामुल्य पाठवित जाऊ.

## कर सवलत

**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**ला भारतातील कोणत्याहि एका व्यक्तिद्वारे किंवा संस्थाद्वारे देण्यात येणारी देणगी हि आयकर कायद्याच्या ८० जी कलमा अंतर्गत कर सवलतीस पात्र ठरते. कृपया आपली देणगी डी.डी./धनादेश/मनी आर्डर "**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**" च्या नावाने खालील तपशीलानुसार आम्हाला पाठवा

| | |
|---|---|
| Account Name | : ECHO OF HIS CALL EDUCATIONAL TRUST |
| Account Number | : 1023 2923 805 |
| Bank Name | : STATE BANK OF INDIA |
| Branch | : TRIPLICANE, CHENNAI - 600 005 |
| IFSC Code | : SBIN 0000249 |
| SWIFT Code | : SBI NIN BB 455 |



# खड्ड्यातून महालापर्यंत

## PIT TO PALACE

“नाचणाऱ्याने हे ध्यानात आणावे !” (मत्तय २४:१५)

(पास्टर एस. सॅम सेलवाराज यांच्या जीवनातील अनुभव)

# येशू ख्रिस्त! चमत्कार करणारा!

“...कोणी माझी सेवा करील तर, पिता त्याचा मान करील.” योहान (१२:२६)

देवाने माझ्या द्वारे वेगवेगळ्या प्रसंगी मोठ्या अशा गोष्टि घडविल्या देवाने मुख्यालयात आणि इतर ठीकाणातील सेवाकार्यात मजकडून चमत्कार आणि अद्‌भूत गोष्टि करवून माझा सन्मान केला. त्याद्वारे या सेवाकार्याचा सुगंध जगातील अनेक भागात पसरला. देवाचे नाम गौरविले जावो.

एके रविवारी ऑस्ट्रेलीयातील मेलबोर्न आणि ब्रिसबेन येथे वचनाची सेवा करीत असताना, अनेकांना देवाचा गौरवी स्पर्श झाल्याचे जाणवले.

एके दिवशी मी रहात असलेल्या घरात एक ऑस्ट्रेलीयन जोडपे मला येऊन भेटले. त्यांच्या विवाहास १३ वर्षे झाली; तरी त्यांना मुल नाहि असे मला सांगताना त्यांच्या डोळ्यांत अश्रु होते. त्यांनी मला असे देखील सांगितले की ते शांतिपूर्ण मार्गाने घटस्फोट घेणार आहेत. त्याकरिता मी प्रार्थना करावी अशी विनंती केली (त्यांच्या देशात घटस्फोट अतिशय सर्वसामान्य अशी गोष्ट आहे.)

मला वाईट वाटले मी त्यांना विचारले की तुम्हाला मुल व्हावे यासाठी मी प्रार्थना करु कां? त्यांना हसू आले आणि मला म्हणाले आम्ही अनेक प्रसिद्ध डॉक्टरांकडे गेलो; परंतु ते कांही करु शकले नाहीत. त्यांनी मला प्रश्न केला “प्रार्थना केल्याने मुल कसे काय प्राप्त होऊ शकते? तेव्हा मी त्यांच्या सोबत बसलो आणि त्यांना विश्वास आणि त्यांचा विश्वास आणि त्यांचे फलीत आणि देवाचे सामर्थ्य याबाबत समुपदेशन केले आणि त्यानंतर आत्म्यामध्ये आग्रहाने त्यांच्या करिता प्रार्थना केली.

प्रभुची स्तुति असो दोन महिन्यांच्या कालावधी नंतर मी भारतात परत येण्यासाठी विमानतळावर गेलेलो असताना या जोडप्याला एक मोठी भेट वस्तू घेऊन मजकडे येत असलेले पाहिले. विमानतळावर जवळ-जवळ मोठ्याने अश्रु ढाळून रडत असलेले पाहून मला धक्का बसला. विमानतळावर उपस्थित सर्व लोक हे पाहात होते.



*देवाने त्यांना मुलेबाळे देऊन आशीर्वादीत केले.*

सरतेशेवटि पतीने मला सांगितले कि डॉक्टरांनी ती गर्भवती असल्याचे जाहिर केले आहे. ते अतिशय आनंदीत होते आणि त्यांनी पुष्कळसे कपडे आणि सेवाकार्याकरिता उपयुक्त अशा गोष्टि असलेली पार्सल मला भेट दिली. देवाने त्यांना प्रथम एक कन्या आणि त्यानंतर आणखीन दोन मुले देवुन आशीर्वादीत केले.

प्रिय मित्रांनो, देव तुमच्या जीवनात देखील असा चमत्कार करण्यास समर्थ आहे. त्याजवर विश्वास ठेवा आणि विश्वासाने मागा. तो तुमच्या सर्व गरजा पुरविल.

प्रभु आणि तारणारा येशू ख्रिस्त ज्याच्या विषयी मी संदेश देतो तो अपत्य नसलेल्या जोडप्याला अपत्य देण्यास आजाऱ्यास आरोग्य आणि इतर आशीर्वाद देण्यास समर्थ आहे. तो काल, आज आणि सर्वकाळ सारखाच असणारा आहे. देवाचा गौरव असो!

(पान ६ वरुन...)

तुम्ही परत यावे असे देव इच्छितो, त्यावेळी तुम्ही प्रथम संत बनावे आणि नंतर त्याजकडे यावे असे इच्छित नाही. जसे आहात तसे; तुमचे सामान, वेदना, निराशा, क्रोध, विफलता, पराभव आणि एकटेपण या सर्वासहित यावे.

येशू ख्रिस्त तुमच्या धडपडण्यात सहभागी होतो.

त्याच्या जीवनाच्या शेवटच्या तासांत, लोकांचा जमाव, त्याच्या भोवती असणाऱ्या ऐवजी, गेथशेमाने बगिव त्याने एकटेपण अनुभवले. तुमच्याकडे धन असेल; वशिला, मोठेपणा असेल तरीदेखील एकाकीपणाच्या मिठीत असणार. देव त्या एकांकीपणाचे गांभिर्य जाणतो. त्याने आदामाचा एकाकीपणा दूर करण्यास हवेला तयार केले, आपणापैकी अनेकजण अवर्णनीय अशा एकांकीपणात तुटून गेलेल्या अवस्थेत आहेत.

देव तुम्हाला शोधीत आहे, त्याला तुम्हाला जवळ करता यावे यासाठी तो तुम्हाला एकत्रीत करु इच्छितो.

तुम्ही गर्भगळीत, अपमानीत, पराभवित अवस्थेत असाल, तरी देव तुम्हाला



एकत्रीत करण्याची इच्छा आहे.

**"परमेश्वर भग्नहृदया लोकांच्या सान्निध असतो; अनुतृप मनाच्या लोकांस तो उद्धारितो."** (स्तोत्र ३४:१८).

**"भग्नहृदयी जनांस तो बरे करितो; तो त्यांच्या जखमांस पट्या बांधितो."** (स्तोत्र १४७:३)

**"...मी उच्च व पवित्र स्थानी बसतो; तसाच ज्याचे चित्त अनुतापयुक्त व नम्र आहे त्याच्या ठायीहि मी बसतो..."** (यशया ५७:१५). देवाला नविन असे काही करण्यास भग्नहृदयाची प्रथम आवश्यकता असते.

तुम्ही कदाचीत पापाने, वाईट सवयी, आजार, आर्थिक अडचणी, वांशिक शाप किंवा रुढी-परंपरा यांनी बांधलेले असाल, देव तुमच्यावर प्रेम करीत असल्यामुळे तुम्ही परत यावे यासाठी तुम्हाला एकत्रीत करु इच्छितो. तुम्ही देवापासून फार दूर जात आहात, असे तुम्हाला वाटत असेल,



तर लक्षात ठेवा, तो म्हणत आहे; "मला तुम्ही हवे आहात." तुम्ही त्याजकडे परत माघारे फिराल कां?

अनेकजण चौरस्त्यावर उभे आहेत; आजच मनाची तयारी करा आणि त्याला शरण या.

शरण - येण्यास - नकार द्याल, तर देव तुम्हाला जावू देईल, परंतु तुम्हाला परिणामांना सामोरे जावे लागेल.

लक्षात ठेवा देवाला तुमची गरज आहे.

********

## स्तोत्र १०३:२१-२२

**"अहो परमेश्वराच्या सर्व सैन्यांनो, जी तुम्ही त्याची सेवा करुन त्याचा मनोदय सिद्धीस नेता, ती तुम्ही त्याला धन्यवाद करा. परमेश्वराच्या साम्राज्यातील सर्व ठिकाणचे त्याचे अखिल सृष्टपदार्थहो त्याचा धन्यवाद करा, हे माझ्या जिवा, परमेश्वराचा धन्यवाद कर."**


## पाहिजेत

**एको ऑफ हीज कॉल, चेन्नाई**
**नहेम्या बायबल कॉलेजसाठी**
*** हिंदी भाषिक ***

* HINDI LANGUAGE *

**डीन (निवासी) : अधीष्टाता हिंदी धर्मशास्त्र ज्ञानी M. Div. / M. Th. पदवीधारक आणि अनुभवी. वेतना सहित राहाण्याची व भोजनाची सोय उपलब्ध. आम्हाला हिन्दी भाषिक विद्यार्थी देखील हवे आहेत.**

*पात्र उमेदवारांनी संपूर्ण माहिती ई-मेल द्वारा पाठवावी*

E.mail: sam@echoofhiscall.org
WhatsApp: (+91) 98412 71858



## सेन्ट पॉलस् मेट्रीक्युलेशन स्कूल

मेदावाक्कम, चेन्नाई - १००.

*एको ऑफ हिज कॉलची संस्था*

- अनुभवी शिक्षक
- सर्वश्रेष्ठ कोचींग
- खेळण्याची पद्धत
- खेळाचे भरपूर साहित्य
- रेखाचित्र आणि चित्रकला
- नृत्य, गाणी आणि सांस्कृतिक उपक्रम
- इंग्रजी बोलणे
- सामान्य फी संरचना
- वातानुकूलीत वर्ग

**प्रवेश सुरु आहे!**

प्रि. के. जी. ते दहावी पर्यंत

**आतांच नोंदणी करा!**

अर्ज करण्यासाठी शाळा कार्यालची मुलाकात घ्या

आमच्याशी संपर्क करा :

फोन नंबर - 963 963 1295,044 - 2278 0574


## वाचकांनो लक्ष द्या!

### पास्टर एस्. सॅम सेल्वा राज यांची आत्मचरित्र

पास्टर एस्. सॅम सेल्वा राज यांच्या आत्मचरित्र पुस्तक स्वरूपात छापण्याच्या अंतिम टप्प्यात आहोत. **त्यांच्या सेवेचा तुमच्या जीवनावर कसा प्रभाव पडला याविषयी आम्ही तुमच्याकडून दहा ओळींची साक्ष अपेक्षित आहोत. त्यासोबत आत्मचरित्रात तुमचा फोटो छापण्यात आम्हाला आवडेल.**

- संपादक

RNI NO. 70106/98, Postal Regn. No. TN/CH/(C)/206/24-26 WPP NO. TN/PMG(CCR)/WPP-261/24-26

## एको ऑफ हिज कोल

**यु ट्युब**
**सबस्क्राईब करा**

जेव्हा तुम्हाला वेळ मिळेल तेव्हा कृपा करुन आमच्या **एको ऑफ हिज कॉल यु ट्युब चॅनल** बघा व सबस्क्राईब करा. धन्यवाद

**- संपादक**

## OUR BANK DETAILS:

***1. Bank : State Bank of India***

Branch : **Triplicane, Chennai-5**
Name : **S. Sam Selva Raj**
A/C No. : **1023 2934 679**
IFSC : **SBIN 00 00 249**
SWIFT CODE : **SBI NIN BB 455**

***2. Bank : ICICI Bank***

Branch : **Anna Salai, Chennai-6**
Name : **Echo of His Call**
A/C No. : **6038 0502 2319**
IFSC : **ICIC 000 6038**

***3. Bank : State Bank of India***

**(This Account is for Tax Exemption for Indians only )**

Branch : **Triplicane, Chennai-5**
Name : **Echo of His Call Educational Trust**
A/C No. : **1023 2923 805**
IFSC : **SBIN 00 00 249**

**Google Pay: 98410 71858**
**PayPal : SAM SELVA RAJ**
*****
**E.mail : sam@echoofhiscall.org**

# ECHO OF HIS CALL

१७ भाषेत मासिक, बायबल कॉलेज पत्रव्यवहाराद्वारे अभ्यासक्रम मंडळी रोपन कार्य. गावात इंग्रजी माध्यम शाळा, शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय, महासभा, शिबीर, सामाजिक सेवा इत्यादि.

**वार्षिक वर्गणी : रूपये १००/-     आजीवन वर्गणी : रूपये २०००/-**

एको ऑफ हिज कॉल मिनिस्ट्रीजची विविध सेवा कार्ये तुमच्यासारख्या स्वेच्छा दान आणि देणग्या देणाऱ्या देवाच्या लेकरांनी दिलेल्या आधाराद्वारे करण्यात येतात. या सेवाकार्याकरिता देव तुम्हाला सुचवेल तशा प्रकारे तुम्ही आधार देवू शकता. शुभवर्तमान न पोहंचलेल्या लोकांपर्यंत ते नेण्याकरिता व मंडळ्या रोपन कार्याकरिता आम्हांला तुमच्या मदतीची गरज आहे.

एको ऑफ हिज कॉल मासिक तुम्हांला नित्य नियमाने मिळावे अशी तुमची इच्छा असेल तर कृपया आम्हाला लिहून कळवा. तुमचा पोस्टाचा किंवा ई-मेलचा पत्ता बदलला असेल तर कृपया जुना व नवा पत्ता आम्हांला कळवा.

आमच्या वेब साईटवर देखील १७ भाषेतील मासिक उपलब्ध आहे. तुम्ही साईट वर जाऊन ते वाचू सकता व डाऊन लोड देखील करून आशीर्वादित होऊ शकता.

Your letters, prayer requests and your financial helps **(Money Orders, Cheques or Demand Drafts, NEFT, PayPal (Sam Selva Raj, sam@echoofhiscall.org) PhonePe (98410 71858), Gpay (98410 71858), Western Union, MoneyGram, etc.)** to **ECHO OF HIS CALL** may please be sent to the address below.

आम्हांला आमची यादि अद्यावत करण्याकरिता कृपया तुमचा घरचा फोन मोबाईल फोन क्रमांक आणि ई.मेल कळवा.

Our address :

**ECHO OF HIS CALL**

10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA
PH: (+91-44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766/ Cell: (+91) 98410 71852, 95661 31858 / E.mails: sam@echoofhiscall.org / biblecor@yahoo.co.in
Websites: www.echoofhiscall.org / www.stpaulsmatriculation.com

**YOU CAN SEND YOUR DONATIONS BY ONLINE ALSO**

RNI NO. 70106/98
**Postal Regn. No. :TN/CH/(C)/206/24-26**
**WPP NO. TN/PMG(CCR)/ WPP- 261/24-26**
**Date of Publication: Second week of every month**
**Date of Posting : 11th & 12th of every month**
**Posted at "Egmore RMS / 1 Patrika Channel"**
**on 12th JUNE 2024**
**If un-delivered please return to:**
**ECHO OF HIS CALL (MARATHI)**
**P.O. Box No. 2957,**
**Chepauk, Chennai - 600 005, INDIA.**
**Phone: (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766**

***JESUS LOVES YOU!***

**To**

*GOD BLESS YOU!*

Owned and published by **S. Sam Selva Raj** from New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005 and printed by **S. Sam Selva Raj** at **Echo of His Call Printers,** New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005. Editor: **S. Sam Selva Raj.**